# किती जवळ ! किती दूर !

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**किती जवळ ! किती दूर ! : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

# किती जवळ ! किती दूर !

# १

कुसामावशी आपल्या खोलीजवळ आल्या आणि कुलुप काढण्यासाठी कमरेला लावलेल्या किल्ल्या चासपू लागल्या. तितक्यात चाफेकरांचा चंदू खोलीपुढे उभा असलेला त्यांना दिसला.

तो त्यांना म्हणाला, 'तुमची वाटच बघत होतो. सकाळपासून दोनदा येऊन गेलो. पण तुमची खोली बंद असलेली पाहून परत गेलो. आता तिसऱ्या खेपेस मात्र तुम्ही येईपर्यंत वाट पाहायचं ठरविलं.'

कुसामावशीनी विचारलं, 'फार वेळ वाट पाहिलीस काय?'

फार वेळ नाही. पण खरं म्हणजे तुमचा राग आलाय.'

कुसामावशी हसल्या आणि म्हणाल्या, 'तो काढू आपण.' त्यांनी खोलीचं कुलुप काढलं, दार लोटलं आणि चंदूला म्हणाल्या, 'ये, आत ये.' चंदूनं त्यांच्या खोलीत पाऊल टाकलं आणि ते टाकल्याबरोबर त्याला एकदम बरं वाटलं... का कोणास ठाऊक, कुसामावशींच्या खोलीत प्रवेश करता क्षणीच त्याला नेहमी असंच बरं वाटत असे.

कुसामावशींची खोली काहीशी अंधेरीच होती. ज्या सोप्याला लागून ती खोली होती ती सोप्याच्या बाजूस खोलीला एक ठेंगणी खिडकी होती. त्या खिडकीतून खोलीत काय प्रकाश येत असे तेवढाच. अवघ्या दोन खणांची होती ती खोली. ठेंगण्या खिडकीजवळ एक जीर्ण झालेली विटलेली छोटी सतरंजी टाकलेली असे. जवळ एका लाकडी खोक्यावर पोथ्या ठेवलेल्या असत. कुसामावशी काही कामात

गुंतलेल्या नसल्या म्हणजे पोथीतलं एखादं पान काढून निकलच्या दांडीचा चष्मा डोळ्यावर चढवून वाचीत बसलेल्या दिसत. सोप्यावर झोपाळा होता, त्या झोपाळ्यावर मुलांचा दंगा चाललेला असे. परंतु त्या दंग्यामुळे कुसामावशींची एकाग्रता बिघडत नसे. 'सं... ज...य. म्ह....णा...ला' असं एकेक अक्षर लावून त्यांचं वाचन चालू राहात असे... त्या विधवा होत्या आणि या बिऱ्हाडात त्या एकट्याच राहात असत. त्याना जवळची नातेवाईक माणसं होती की नव्हती कुणास ठाऊक? तीन रुपये भाड्याच्या या खोलीत त्या एकट्या राहात असत खऱ्या. वाड्यातल्या इतर भाडेकरूंना एवढंच माहीत होतं की त्या मूळच्या मावळातल्या पौड गावच्या होत्या, आणि कुठेतरी सैपाकिणीचं काम त्या करीत असत. कुणाच्याही अध्यात मध्यात त्या नसत. आपली खोली बरी का आपण बऱ्या असं त्यांचं वागणं असे... ज्या घरी त्या स्वयंपाकाला होत्या त्या घरी त्या जेवीत नसत. काम करून परत आल्यावर देवाची पूजा करावी, शनिमहात्म्य वाचावं, स्वयंपाक करावा आणि जेवावं असा त्यांचा क्रम असे.... स्वयंपाकाची चार भांडी, एका कोपऱ्यात घडवंचीवर ठेवलेले देव, दांडीवर वाळणारं लुगडं आणि खिडकीजवळ टाकलेली सतरंजी व लाकडी खोक्यावर ठेवलेल्या पोथ्या, एवढंच त्यांच सामान होतं. परंतु खोली कशी सदा आरशासारखी स्वच्छ असे.

कुसामावशींच्या त्या खोलीत पाऊल टाकल्याबरोबर चंदूला एकदम प्रसन्न वाटत असे. कुसामावशी त्याला फार आवडत असत. त्यांच्यासाठी बाजारातून एखादी देवाची छोटी तसबीर आणून देणं, गुरुवारी नारळ आणून देणं, त्यांचा चष्मा एखादं वेळेस बिघडला तर दुरुस्त करून आणून देणं, अशी त्यांची कामं करण्यात त्याला फार आनंद वाटत असे, कधी कधी त्यानं कुसामावशींना म्हणावं, 'चांगल्या फ्रेंमचा चष्मा घ्या ना.' कुसामावशींनी म्हणावं, 'काय करायचाय नवा चष्मा? माझा जुनापाना आहे तोच बरा आहे. मला वाचायचं असतं ते किती? घटका दोन घटका. तुझ्यासारखा अभ्यास करायचा आहे थोडाच? आणि माझी दृष्टीही फारशी बिघडलेली नाही. तांदूळ निवडते मी अजून !'... कुसामावशींच्या असल्या बोलण्याची चंदूला फार गंमत वाटायची...

चंदूलाच नव्हे तर साऱ्याच मुलांना कुसामावशी फार हव्या हव्याशा वाटत असत. शनिवार पेठेतल्या माणकेश्वराच्या कोपऱ्यावर केळकरांचा वाडा, लिमयांचा



वाडा, फाटकांचा वाडा अशा शेजारशेजारच्या वाड्यात दहा-पाच बिऱ्हाडं होती. त्यातल्या समवयस्क मुलांचं एक टोळकंच होतं. या टोळक्यातल्या साऱ्याच मुलांना कुसामावशी अतिशय प्रिय होत्या. मुलं त्यांच्या खोलीत आली की त्यांना त्या काही ना काही खाऊ घालीत असत. त्या एकेक डबा काढीत असत आणि त्यातला चिवडा म्हणा, शंकरपाळे म्हणा साऱ्या मुलांपुढे ठेवीत असत. कधी कधी त्या फोडणीचे पोहे करीत आणि मुलांना खाऊ घालीत. मुलं खोलीत आली, त्यांनी कलकलाटानं खोली भरून टाकली, खाणं पिणं केलं म्हणजे कुसामावशींना फार बरं वाटायचं.

चाफेकरांच्या चंदूवर त्यांची खास माया असावी. तो एकटाच त्यांच्याकडे आला की दुधात केलेली दशमी त्या त्याच्यापुढे एका ताटलीत ठेवीत. तोंडी लावण्यासाठी बरणीतलं आंब्याचं लोणचं काढून घालीत... आतादेखील चंदू सतरंजीवर बसल्यावर त्यांनी त्याच्यापुढे ताटली ठेवली आणि 'वालांची उसळ आवडते ना तुला? आज दुपारी केली होती मी' असं म्हणून उसळीनं भरलेली वाटी त्यानी त्याच्या ताटलीत ठेवली.

चंदू खात होता. कुसामावशी त्याला सांगत होत्या, 'काल माणकेश्वराच्या मंदिरात बडोदेकरांचं कीर्तन झालं. चिलया बाळाचं व्याख्यान लावलं होतं त्यांनी. त्यांच्या तोंडचं वर्णन ऐकताना पदरानं डोळे टिपता टिपता पुरेवाट झाली मला. रडताना मनात येत होतं, देव भक्तांचा इतका अंत काय म्हणून पाहतो?...'

चंदूचं खाणं आटोपल्यावर कुसामावशींनी ताटली उचलून ठेवली. चंदूनं हात धुतले... मग पुन्हा सतरंजीवर बसताना तो म्हणाला, 'नाटकाचं आमंत्रण तुम्हाला द्यावं म्हणून आलो होतो. हा घ्या तुमचा पास.'

त्यानं हिरव्या रंगाचा एक कागद पुढे केल. त्याकडे बघत कुसामावशींनी आश्चर्यानं विचारलं, 'कुठलं नाटक म्हणतोस?' नाट्यकला प्रवर्तकचं 'हरिश्चंद्र' नाटक गाजतंय ना सध्या, त्या नाटकाचा पास मिळवला आहेस काय माझ्यासाठी? एकदा पाहायचं आहे मला ते नाटक. गोपाळराव मराठे तारामतीचं काम फार उत्तम करतात म्हणे...'

चंदू म्हणाला, 'नाही नाही कुसामावशी, त्या नाटकाचा पास नाही देत तुम्हाला.'

काहीशा निराशेच्या स्वरात कुसामावशींनी प्रश्न केला, 'मग कुठलं नाटक म्हणतोस?'

चंदूनं सांगितलं, 'आम्ही मुलांमुलांनी बसविलं आहे एक नाटक. ते बघायला यायला हवं तुम्ही. वाड्यातल्या आणि शेजारपाजारच्या साऱ्या बायकांना बोलावलंय आम्ही. पण त्यांनी तिकिटं काढायला हवीत. तुम्हा मात्र तिकीटबिकिट काही न काढता आमच्या खास पाहुण्या म्हणून यायचं आहे.'

कुसामावशी थोड्याशा हसल्या आणि चंदू दुखविला जाऊ नये इतक्या बेतानं त्यानी चेष्टेनं प्रश्न केला, 'काय दर आहेत तिकिटांचे?'

चंदूनं सांगितलं, 'वेगवेगळे दर नाहीत. कारण ज्या बायका येतील त्या साऱ्याजणी एकत्रच बसायच्या आहेत. सगळ्यांना एकच दर ठेवला आहे. फक्त एक आणा.'

कुसामावशींनी पुन्हा प्रश्न केला, 'आणि तुमचं हे नाटक व्हायचंय कुठे?'

चंदू म्हणाला, 'दातारांच्या माडीत. जयंतानं रिळं वापरून सरकता पडदा काय छान तयार केला आहे. येत्या आदितवारी जयंताचे वडील तात्यासाहेब ड्युटीवर बाहेरगावी जायचे आहेत. ती संधी साधून आम्ही नाटकाचा प्रयोग करणार आहोत. नेन्यांच्या बाळूनं उत्तम अक्षर काढून कसं सुंदर हँडबिल तयार केलं आहे ते बघा ना.' असं म्हणून चंदूनं खिशातला एक कागद काढला आणि पुढे केला.

कुसामावशींनी आपल्या निकलच्या दांडीचा चष्मा डोळ्यावर चढविला आणि हँडबिल त्या वाचून पाहू लागल्या.

चंदूनं आणि त्याच्या सोबत्यानी नाटक कंपन्यांची हँडबिलं जमविली होती. धंदेवाईक कंपन्यांच्या छापील नमुन्याबरहुकूम आपल्या नाटकाचं हस्तलिखित हँडबिल तयार केलं होतं आणि अनेक रंगांच्या शाई वापरून बाळूनं ते सुंदर अक्षरात लिहून काढलं होतं.

हँडबिलावर नाटक करणाऱ्या कंपनीचं नाव होतं, 'नाट्यकलासेवक बालगोपाळ कंपनी.' (१९०७ च्या सुमाराच्या त्या काळात 'नाट्यकला प्रसार मंडळी' नावाची एक प्रख्यात नाटक कंपनी पुण्यात आपले खेळ करीत होती. तिच्या नावाची ही नक्कल असावी.) हँडबिलात नाटाकचा प्रयोग कुठे होणार, केव्हा होणार ते लिहिलेलं होतं आणि तिकिटांच्या अनेक दरांऐवजी एक आणा असाच दर लिहिला होता. मात्र छापील हँडबिलातल्या शेवटच्या दोन ओळी लिहिल्या होत्या. 'विशेष



सूचना– आमची मर्जी नसेल त्यास प्रवेश मिळणार नाही.' 'वेश्यांसाठी निराळी जागा ठेवलेली आहे.'

हस्तलिखित हँडबिलातल्या त्या शेवटच्या दोन ओळी वाचून कुणालाही हसूच येण्यासारखं होतं.

कुसामावशींनाही हसू आलं परंतु ते त्यांनी तोंडावर दिसू दिलं नाही. उलट 'छान आहे छान आहे' असं म्हणून त्यांनी हँडबिलाचा कागद चंदूच्या हाती परत दिला.

कुसामावशींच्या शाबासकीनं खूष झालेला चंदू त्यांचा निरोप घेताना म्हणाला, 'मावशी, तुम्ही यायलाच हवं बरं का आमच्या नाटकाला, नाही तर जाल कुठे तरी कीर्तनाला किंवा पुराणाला. तुम्ही न आलात तर आमची सबंधच्या संबध नाटक कंपनी तुमच्यावर रागावेल. तुमची गट्टी फू करू आम्ही.'

'येईन रे येईन. अगदी लक्षात ठेवून येईन.' असं सांगताना कुसामावशींनी त्याला प्रेमानं कुरवाळलं.

०००

पुण्याच्या शनिवार पेठेत माणकेश्वराच्या कोपऱ्यावर केळकरांचा आणि लिमयांचा असे दोन वाडे एकमेकाला लागून होते. समोर फाटकांचा वाडा होता. प्रत्येक वाड्यात चार-सहा बिऱ्हाडं होती. त्या बिऱ्हाडातल्या बारा बारा तेरा तेरा वर्षांच्या मुलांचं एक टोळकं होतं. त्यांचे विटीदांडू, क्रिकेट असे खेळ मात्र चालत असत लिमयांच्या वाड्यात. कारण त्या वाड्याला मोठं अंगण होतं.

या टोळक्यांतल्या साऱ्याच मुलांची एकमेकाशी मैत्री होती, परंतु त्यातल्या त्यात विशेष दोस्ती होती चाफेकरांचा चंदू, दातारांचा जयंत आणि नेन्यांचा बाळू यांची. आणि चंदू होता या साऱ्या मुलांचा पुढारी.

चंदूचे वडील बाबासाहेब एका बँकेत मोठ्या हुद्द्यावर होते. परंतु त्यांची अधिक ख्याती होती संस्कृतचे स्कॉलर म्हणून आणि वैदिक वाङ्मयाचे अभ्यासू म्हणून. जयंतचे वडील तात्यासाहेब रेल्वेत नोकर होते. बाळूचे वडील नानासाहेब यांचं बुधवारच्या बाजारपेठेत कापड दुकान होतं. मध्यम वर्गातलीच होती ही तिन्ही कुटुंब. परंतु विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातल्या त्या काळात स्वस्ताई होती, सुबत्ता होती. थोड्या कमाईतही सुखासमाधानानं राहता येत होतं.

चंदू, जयंत, बाळू आणि त्यांच्या टोळक्यातली मुलं श्रीमंताची नव्हती, परंतु खाऊन पिऊन सुखी असल्यासारखी होती. शरीरानं धष्टपुष्ट, आनंदी, खोडकर. नूतन मराठी विद्यालयात, न्यू इंग्लिश स्कूल, भावे स्कूल अशा वेगवेगळ्या शाळातून ही मुलं शिकत होती. आपापल्या शाळेतच्या अभिमानानं त्यांच्यात कधी कधी भांडणंही होत असत. परंतु ही भांडणं मिटायलाही वेळ लागत नसे आणि एरवी त्यांची एकजूट असे... आषाढी कार्तिकी एकादशीला विठ्ठलवाडीस, श्रावण महिन्यातल्या दर सोमवारी पर्वतीस, महाशिवरात्रीला पाषाणास, नवरात्रात चतु:शृंगीला अशा त्यांच्या ट्रिपा निघत. उन्हाळ्यात मोठ्या सुट्टीत आज ह्या विहिरीवर, उद्या त्या विहिरीवर अशा प्रकारे गावातल्या विहिरीवर त्यांनी जावं आणि येथेच्छ पोहण्याचा कार्यक्रम करावा. माणकेश्वराचे मंदीर, खुन्या मुरलीधराचं मंदिर अशा ठिकाणी नावाजलेल्या कीर्तनकारांची कीर्तनं होत असत. पत्र्या मारुती, गवत्या मारुती, भांग्या मारुती अशा देवळापुढच्या हमरस्त्यावरही कीर्तनं व्हायची. पण ती रात्रीच्या वेळेस. या रात्रीच्या कीर्तनासाठी चंदू आणि त्याचे मित्र आवर्जून जात असत. कारण त्या ठिकाणी एक खोडकरपणा त्यांना करता येत असे. कीर्तनासाठी रस्त्यावर भाविक श्रोत्यांची थाप बसलेली असे. या गर्दीत बसण्याऐवजी चंदूनं आणि त्याच्या मित्रांनी दूर अंतरावर उभं राहावं आणि बरोबर आणलेल्या बेडक्या गर्दीत फेकून घबराट उडवावी, 'अरे साप, अरे साप ! असं ओरडत गर्दीतल्या माणसांनी उठून धावू लागावं आणि इतरांनी 'साप नाही ! बसून घ्या. बसून घ्या.' असं त्यांच्यावर ओरडावं. घबराट दोन –चार मिनिटंच टिकायची. पण 'कशी केली गंमत' अशा विचाराचं हवं ते समाधान चंदूला आणि त्याच्या मित्रांना मिळायचं...

त्या काळात पुण्याचा विस्तार फार लहान होता. गावाच्या हद्दीवर पर्वतीच्या पायथ्यानजीकच्या भागात, कोथरूडच्या आसपास आणि फर्गसन कॉलेजच्या आजूबाजूस बागा होत्या. त्या बागांत आंब्यांची झाडं, जांभळाची झाडं होती. वसंत ऋतूत चंदूनं आणि त्याच्या मित्रांनी या बागात आणि आमरायात घुसून मोठी टपोरी जांभळं मनसोक्त खावी आणि आंब्याच्या झाडावरच्या कैऱ्या पाडून खाव्या. कैऱ्याबरोबर तोंडी लावायसाठी म्हणून घरून तिखट मीठ मेतकूट लहान लहान पुड्यात बांधून न्यावयास त्यांनी विसरू नये. कधी कधी रखवालदारानं या 'बामण्याच्या पोट्ट्या' ना पकडावं, थपडा माराव्या, त्यांच्या डोक्यावरच्या टोप्या हिसकून घ्याव्या. टोप्या



परत मिळविण्यासाठी मुलांनी रखवालदारापाशी गयावया करावी. मग रखवालदारानं टोप्या परत देता देता चार शिव्या घालाव्या आणि दरडावून ताकीद द्यावी, 'पुन्हा पाऊल घालाल बागंमंदी तर येकेकाचं तंगडचं तोडीन, जा, जा बघू आपापल्या घरला'... थपडा खाण्याची किंमत देऊन चार चार आंबे घरी न्यायला मिळाले, हा काही महाग सौदा नव्हे, अशा विचाराच्या खुषीत मुलांनी घरची वाट धरावी. पुन्हा बागेत न शिरण्याचा धडा त्यांनी घेतला असता तर त्यांना लहान मुलं कुणी म्हटलं असतं?

चंदूची आणि त्याच्या मित्रांची उन्हाळ्यातली आणखी एक चैन म्हणजे रसपान. त्या जुन्या काळात उसाचा रस काढण्याचा घांणा विजेवर चालत नसे आणि ग्लासातून रस पिण्याची काव्यशून्य मूर्ख पद्धती लोकांना ठाऊक नव्हती. मोकळ्या जागेत खड्डा खणलेला असे, त्यात मोठा लाकडी चरक बसविलेला असे. त्या चरकाचं जू बैलाच्या मानेवर दिलेलं असे. बैल वर्तुळाकार फिरत असे. खड्ड्यात एक माणूस बसलेला असे, तो चरकात ऊस सरकवीत असे, एका खूप मोठ्या कल्हई लावलेल्या तपेल्यात रस साठवीत असे, बैल फिरू लागला की चरकाचा 'घ्राँ ऽ ऽ व' असा श्रुतिमधुर आवाज आवारात भरून जात असे. हा घाणा असायचा मागच्या बाजूला आणि गुऱ्हाळाच्या दर्शनी भागात सारवून स्वच्छ केलेल्या एका ओट्यावर घासून आरशासारखा स्वच्छ केलेल्या शेरा दोन शेरांच्या पितळी तपेल्या आणि तशीच आरशासारखी स्वच्छ दिसणारी उंच उंच फुलपात्रं मांडलेली असायची. ओट्यावर रांगोळी काढलेली असायची. हळदकुंकू टाकलेलं असायचं. फुलंही टाकलेली असायची. केळीच्या पानावर काही सबंध लिंबं, काही कापलेली लिंब मांडलेली असायची. गिऱ्हाइकासाठी दोन बाकं ठेवलेली असायची. रस खूप स्वस्त असायचा. ग्लास, अर्धा ग्लास अशी दरिद्री मागणी त्या काळात कुणाला ठाऊक नव्हती. रस प्यायचा तो निदान अर्ध्या शेर मापाच्या फुलपात्रातून. शेर दोन शेरांच्या तपेल्या भरून रस पिणारी किती तरी गिऱ्हाइकं असायची.

स्वस्ताई असल्यामुळे घरोघर वासंतिक पूजा व्हायची. चार भिक्षुकांना बोलावण्यात येत असे. त्यानी मंत्रपठण करायचं. मग त्याना आणि दहा पाच निमंत्रितांना आंब्याची वाटली डाळ आणि उसाचा ताजा रस यथेच्छ खाऊ पिऊ घालण्यात यायचा. गुलाबाची फुलं देण्यात यायची. भिक्षुकांच्या दक्षिणेसकट खर्च